**ठळक बातम्या**

- पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात
- राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजी वितरण ५० टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा केंद्र सरकारचा निर्णय
- खरीप हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा असल्याचं केंद्रीय रसायन आणि खत मंत्र्यांचं प्रतिपादन
- पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीबाबत प्रधानमंत्री आज सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार

आणि

- भोंदू बाबा अशोक खरातचा शस्त्रपरवाना रद्द

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचे दर आटोक्यात राखण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात केली आहे. त्यामुळे पेट्रोलवरचं प्रतिलीटर १३ रुपये उत्पादन शुल्क ३ रुपयांवर आलं आहे, तर डिझेलवरचं प्रतिलीटर १० रुपये उत्पादन शुल्क पूर्णपणे काढून टाकलं आहे. यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे.

दरम्यान डिझेलवरच्या  आणि विमानाच्या इंधनावरच्या निर्यातशुल्कात वाढ  केली आहे. डिझेलवर साडे एकवीस रुपये प्रतिलीटर तर विमान इंधनावर

साडे एकोणतीस रुपये प्रतिलीटर दराने निर्यात शुल्क लागू राहील. यामुळे या इंधनांचा देशांतर्गत पुरवठा वाढेल असं सीतारामन यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप ५० टक्क्यावरून ७० टक्क्यापर्यंत वाढवायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. हा अतिरिक्त एलपीजी प्रधान्यानं पोलाद, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, रसायनं आणि प्लॅस्टिक उद्योगांना पुरवला जाईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात एलपीजीचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादनशुल्कात कपात करण्याच्या केंद्रसरकारच्या निर्णयाचं मंत्रिमंडळ सदस्यांनी स्वागत केलं आहे. पश्चिम आशियातल्या युद्धामुळे जगात सर्वत्र इंधनाचे दर वाढत असताना देशांतर्गत इंधन दर आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारने स्वतः भार उचलल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी म्हटलं आहे. राजनाथ सिंग, अमित शहा, पीयुष गोयल, किरेन रिजिजू या मंत्रिमंडळ सदस्यांनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

सरकारच्या या निर्णयाचा फायदा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचत नसल्याची टीका काँग्रेसने केली आहे.

<><><><><>

इंधनावरचं उत्पादनशुल्क कमी करण्याच्या केंद्र सरकारच्या निर्णयाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केलं आहे. केंद्र सरकारचा हा निर्णय जनकल्याणाविषयीची संवेदनशीलता आणि दूरदृष्टी दाखवणारा असल्याची प्रतिक्रिया फडणवीस यांनी समाज माध्यमावर दिली आहे.

**<><><><><>**

गेल्या दशकात युरियाचं देशांतर्गत उत्पादन २ कोटी ३० लाख मेट्रिक टनांवरून ३ कोटी १५ लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढल्याची माहिती केंद्रीय रसायन आणि खते मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. खरीप हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा असल्याचं ते म्हणाले..

**- - होल्ड.. बाईट - नड्डा - -**

जागतिक पातळीवर जेनेरिक औषधांच्या पुरवठ्यापैकी भारताचा वाटा ३० टक्के असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी लोकसभेत दिली.

**<><><><><>**

लोकसभेने संविधानाची एकशेतिसावी दुरुस्ती विधेयक-२०२५, जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना दुरुस्ती विधेयक २०२५ आणि केंद्रशासित प्रदेश सरकार दुरुस्ती विधेयक २०२५ यांवरचा संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत यंदाच्या पावसाळी अधिवेशनापर्यंत वाढवली आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरस्थ पद्धतीने संवाद साधणार

आहेत. या बैठकीदरम्यान राज्यांची सध्याची तयारी, आपत्कालीन योजना आणि अन्य विविध उपाययोजनांचा आढावा घेतला जाईल. पश्चिम आशियातल्या युद्धाच्या आव्हानाचा सामना एकजुटीने करण्याच्या दृष्टीने केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये समन्वय वाढवण्यावर बैठकीत विशेष भर दिला जाणार आहे.

निवडणूक आचारसंहिता लागू झालेल्या पाच राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीत सहभागी होणार नाहीत.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मुंबईत दोन दिवसीय 'पल्स वैद्यकीय परिषदे'च उद्घाटन झालं. राज्यात प्रत्येकाला ५ ते ८ किलोमीटरच्या परिघात गुणवत्तापूर्ण आणि परवडणारी आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचे राज्य सरकारचं उद्दिष्ट असून, यासाठी प्राथमिक आरोग्य सेवा, रेफरल प्रणाली आणि डिजिटल हेल्थवर भर दिला जात असल्याचं यावेळी मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, तसंच राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

लाॅकडाऊन लागणार नाही हे, केंद्र सरकारने जाहिर केलेलं आहे. जे लोक असे अफवा पसरवत आहेत त्या सगळ्यांवर फौजदारी कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिला. आखाती देशातील युद्धस्थितीमुळे इंधन टंचाई आणि लाॅकडाऊन लागणार असल्याच्या अफवांचे त्यांनी स्पष्ट शब्दात खंडन केलं. खोटी माहिती फेसबुक,

एक्स किंवा कुठल्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर टाकणं किंवा या खोट्या पोस्ट व्हॉट्सॲपच्या माध्यमातून फा ॅरवर्ड केलं तरी गुन्हा ठरेल. आणि अशा गुन्ह्यातल्या प्रत्येकावर फौजदारी कारवाई होऊ शकते. या खोट्या अफवा पसरवू नका अन्यथा फौजदारी कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा त्यांनी दिला.

<><><><><>

भारताचा जीडीपी अर्थात सकल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर पुढच्या आर्थिक वर्षासाठी ६ पूर्णांक १ दशांश टक्के इतका राहील असा अंदाज ओईसीडी अर्थात आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेने वर्तवला आहे. २०२७-२८ या आर्थिक वर्षात हाच दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहणार असून त्यामुळे भारत जगातली सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था बनेल, असा अंदाज ओईसीडीच्या हंगामी आर्थिक दृष्टीकोन अहवालात देण्यात आला आहे. जागतिक जीडीपी वाढ २०२६ मध्ये २ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवर स्थिर राहण्याचा अंदाज आहे. ही वाढ २०२७ मध्ये ३ टक्क्यांपर्यंत वाढेल, असा अंदाज या अहवालात वर्तवण्यात आला आहे.

<><><><><>

नाशिकचा भोंदूबाबा अशोक खरात याच्याकडचा शस्त्र परवाना पोलिसांनी निलंबित केला आहे. खरात याच्या सिन्नर इथल्या घराच्या झडतीत एक पिस्तुल आणि २१ काडतुसं सापडली होती. यातल्या पाच काडतुसांचा वापर झाला असून तो कशासाठी करण्यात आला, याचा तपास पोलीस करत आहेत. खरात याचं बँक खातंही सील करण्यात आलं आहे. दरम्यान, या प्रकरणी बळी

पडलेल्या पीडित महिलांचे फोटो समाज माध्यमावर पसरवल्यामुळे सातपूर इथल्या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

बँकॉक इथं सुरू असलेल्या आशिया चषक जागतिक तिरंदाजी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारतीय तिरंदाजांनी भारतीय खेळाडूंनी मिश्र सांघिक प्रकारात सुवर्ण पदक तर महिला संघानं रौप्य पदक जिंकलं आहे. पुरुषांच्या वैयक्तिक गटातही चांगली कामगिरी नोंदवत सर्व पदकं मिळवली. या स्पर्धेत भारतानं दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य पदक मिळवली आहेत.

**<><><><><>**

छत्तीसगढ इथं सुरू असलेल्या खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धेचा आज तिसरा दिवस असून जलतरण, वेटलिफ्टींग, हॉकी आणि फूटबॉल क्रीडा स्पर्धा होणार आहेत. तर आज अंबिकापूर इथं कुस्तीचे सामने खेळले जाणार आहेत.

आज सकाळी झालेल्या महिलांच्या फूटबॉल सामन्यात झारखंडनं आसामला पराभूत केलं. तर गुजरातनं आंध्र प्रदेशला हरवलं.

**<><><><><>**

कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील ओएनजीसीच्या विहिरींमधून १ पूर्णांक ५५ अब्ज डॉलर्स किमतीचा नैसर्गिक वायू बेकायदा वळवल्याप्रकरणी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि उद्योगपती मुकेश अंबानी यांची केंद्रीय सीबीआय चौकशी करण्याची मागणी करणारी याचिका आज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळली. या पूर्वी ४ नोव्हेंबर २०२५ रोजी न्यायमूर्ती ए.एस गडकरी आणि

न्यायमूर्ती रणजितसिंग एन राजा भोसले यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीत त्यांनी सीबीआय आणि केंद्र सरकारला नोटीस बजावली होती.

<><><><><>

हवामानावर आधारित कृषीविषयक सेवा अधिक सक्षम करण्यासाठी भारतीय हवामानशास्त्र विभागातर्फे महाराष्ट्रात ११ नवीन स्वयंचलित कृषी हवामान केंद्रं उभारण्यात येणार आहे. मिशन मौसम च्या दुसऱ्या टप्प्यांत ही हवामान केंद्र उभारली जाणार आहेत. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्या व्यापक उपक्रमाचा हा एक भाग असून, २०२६ च्या अखेरीपर्यंत  अशा प्रकारची २०० केंद्रं देशात उभारण्याचं उद्दिष्ट आहे.

या नव्या केंद्रांमुळे कृषी हवामानविषयक निरीक्षणं अधिक सक्षम होतील आणि शेतकऱ्यांना हवामानाधारित अचूक सल्ला देणे शक्य होणार आहे.

//<><><><><>//